## श्री देव व्याघ्रेश्वराचे स्तवन

श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर,     जय जय जय जय, जय व्याघ्रेश्वर
तुझ्या कृपेने जग हे सुंदर
श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर,     जय जय जय जय, जय व्याघ्रेश्वर !धृ!

तूंचि अनादि तूंचि अनन्त     मायारुपे तूचि अविष्कृत
हृदय-कमल वाहू चरणांवर     श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर !१!

सकल कलांचा शिव निर्माता     शक्ती-शिवांगी शोभे कांता
अद्वैताचे द्वैत मनोहर     श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर !२!

तू सुखकारक तू दु:खहारक     दुष्ट जनांचा तू संहारक
तूचि असशी करूणासागर     श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर !३!

त्रैलोक्याचा स्वामी ईशान     कोटी कोटी तुजला वंदन
साक्षी जगाचा ॐकारेश्वर     श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर !४!

तुझ्या कृपेने जग हे सुंदर
श्री व्याघ्रेश्वर जय व्याघ्रेश्वर,     जय जय जय जय, जय व्याघ्रेश्वर !धृ!

रचना व स्वरबद्ध
श्री. अनुराधा श्रीकृष्ण रानडे,
पुणे. (०२० - २५४४ ०३६२)